**ठळक बातम्या**

- विकसित भारत जी राम जी कायदा आजपासून देशभरात लागू
- महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक विधानसभेत सादर
- विधान परिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर यांची बिनविरोध निवड
- व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात १८३ रुपये ५० पैशांची कपात
- ज्येष्ठ दिग्दर्शक विजया मेहता यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

आणि

- राज्यात पावसाचा जोर वाढला, मुंबईला पाणी पुरवणाऱ्या तलावांच्या पाणलोट क्षेत्रातही पाऊस सुरू

**<><><><><>**

रोजगाराची हमी देणारा विकसित भारत जीरामजी अर्थात विकसित भारत-रोजगार आणि उपजिविका हमी ग्रामीण कायदा २०२५ आजपासून देशाच्या ग्रामीण भागात लागू झाला. प्रत्येक आर्थिक वर्षात १२५ दिवसांच्या वेतनासह रोजगाराची हमी देणारा हा कायदा ग्रामीण भारताला सक्षम करेल, असा विश्वास ग्रामविकास मंत्रालयानं व्यक्त केला आहे. याच्या अंमलबजावणीसाठी यंदाच्या आर्थिक वर्षात ९५ हजार ६९२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विहित मुदतीत काम न मिळाल्यास बेरोजगारी भत्ता देण्याची तरतूद नव्या कायद्यात आहे. हा कायदा जुन्या मनरेगा कायद्याची जागा घेणार आहे. पात्र कामगारांना दररोज रोजगार मिळवा, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारनं राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या समन्वयातून

सर्व तयारी पूर्ण केली आहे, असं केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या महिला शेतकरी आणि शेतात काम करणाऱ्या महिला शेतमजुरांना त्या शेतकरी असल्याचा दाखला देणारं महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक आज विधानसभेत सादर करण्यात आलं. अशा दाखल्यामुळे शेती आणि त्या संबंधित असणाऱ्या सर्व सुविधा तसंच सेवांचा फायदा या महिला शेतकऱ्यांना मिळू शकणार आहे. यामध्ये कर्जमाफी, शेती विषयक सवलती, बी बियाणं, खतं, शेती विषयक कर्ज, पीक विमा आदी सेवांचा समावेश यामध्ये आहे. हे विधेयक कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी विधानसभेत सादर केलं.

PCPNDT कायद्यांतर्गत, IVF सेंटर, सोनोग्राफी सेंटरची तपासणी करण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्याची घोषणा आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत केली. ठाणे जिल्ह्यात बदलापूर मध्ये झालेल्या स्त्री बीज तस्करी प्रकरणी ते बोलत होते. राज्यातली डॉक्टरांची रिक्त पदे भरण्यासाठी कार्यवाही सुरू असल्याचे ते म्हणाले राज्यातल्या ठेवीदारांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण सुधारणा विधेयक राज्य सरकारने आज विधानसभेत सादर केलं.  फसवणूक करणाऱ्यांच्या संपत्तीचा वर्षभरात लिलाव करून ठेवीदारांचे पैसे जलद परत करणे यामुळे शक्य होईल अशी आशा गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधेयक मांडताना व्यक्त केली.

**<><><><><>**

राज्य विधान परिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर यांची आज एकमतानं निवड झाली. ही नियुक्ती निवडणूक होऊन नाही, तर एकमतानं होणं ही या सभागृहाची परंपरा असून ती यंदाही तशीच व्हावी, असं सांगून महाविकास आघाडीचे उमेदवार जगन्नाथ अभ्यंकर यांनी आपला अर्ज मागे घ्यावा, अशी विनंती

संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली, त्यानुसार अर्ज मागे घेतल्याची घोषणा अभिजित वंजारी यांनी केली. त्यानंतर आवाजी मतदानानं सचिन अहिर यांची एकमताने उपसभापती म्हणून निवड झाली.

**<><><><><>**

पेट्रोलियम कंपन्यांनी आजपासून १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या किमती १८३ रुपये ५० पैशांनी कमी केल्या आहेत. त्यामुळे दिल्लीत हा सिलेंडर दोन हजार ९३० रुपयांना मिळेल. या कपातीमुळे हॉटेल्स, कँटीन तसेच इतर संबंधित व्यवसायांना दिलासा मिळणार आहे.

**<><><><><>**

सुप्रसिद्ध नाट्य आणि चित्रपट दिग्दर्शक विजया मेहता यांच्या पार्थिवावर आज मुंबईत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं काल रात्री त्यांच्या निवासस्थानी निधन झालं. त्या ९२ वर्षांच्या होत्या. ‘विजयाबाई’ या नावानं त्या कलावर्तुळात सुपरिचित होत्या. मराठी प्रायोगिक नाट्यचळवळीचा पाया त्यांनी घातला होता. नाट्यदिग्दर्शनात त्यांनी नवीन जागतिक विचार तसंच नवीन आयाम जोडले. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या बॅरिस्टर, सखाराम बाईंडर, हमीदाबाईची कोठी, महानिर्वाण, पुरुष, हयवदन, वाडा चिरेबंदी, इत्यादी नाटकांनी मराठी रंगभूमीवर इतिहास घडवला. रावसाहेब, पेस्तनजी यासारख्या चित्रपटांमधून तसंच स्मृतिचित्रे सारख्या मालिकेतून त्यांनी आपला ठसा उमटवला होता. आपल्या दीर्घ कारकिर्दीत त्यांनी अनेक कलाकार घडवले. त्यांच्या या योगदानाबद्दल १९७५ सालचा संगीत नाटक अकादमी पुरस्कार त्यांना मिळाला होता, तर १९८६ साली रावसाहेब या चित्रपटातल्या भूमिकेबद्दल त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता.

आधुनिक मराठी नाट्यसृष्टीच्या शिलेदार आणि नाट्यक्षेत्रातल्या उत्कृष्टतेप्रती अमिट निष्ठा ठेवणाऱ्या रंगकर्मी आपण गमावल्या आहेत असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

रंगमंच आणि पडद्यावरचा नावाजलेला चेहरा आणि मराठी रंगभूमीवरील ज्येष्ठ निर्मात्या, दिग्दर्शक विजया मेहता यांच्या निधनानं, एका पिढीचं प्रतिनिधित्व करणारा एक चेहरा काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दुःख व्यक्त केलं आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनीही दुःख व्यक्त केलं आहे..

ज्येष्ठ अभिनेता मोहन आगाशे विजयाबाईंना आदरांजली वाहताना म्हणाले..

**- - - होल्ड - बाईट - मोहन आगाशे - - -**

**<><><><><>**

राज्यात अनेक ठिकाणी आज पावसानं जोरदार हजेरी लावली आहे.

मुंबईतल्या गोरेगाव, जोगेश्वरी, मालाड, बोरिवली आणि मुलुंड या पश्चिम उपनगरांमध्ये, तसंच भांडुप, विक्रोळी, घाटकोपर आणि कुर्ला या पूर्व उपनगरांमध्ये आज जोरदार पावसाची नोंद झाली.

**नवी मुंबई** आणि ठाणे येथेही आज जोरदार पाऊस झाला. पावसामुळे नेरुळ, उरण फाटा, नेरुळ, कोपरखैरणे, दहिसर गाव, सानपाडा या भागात पाणी साचल्यानं वाहतुकीवर परिणाम होऊन जनजीवन विस्कळीत झालं.

**रत्नागिरी** जिल्ह्यात पावसाचा जोर आज सलग तिसऱ्या दिवशी कायम होता. चिपळूण-गुहागर मार्गावर अति पावसामुळे माती रस्त्यावर आली तर लांजा तालुक्यात मुंबई-गोवा महामार्गावर वेरळ घाटात दरड कोसळल्याची घटना घडली.

**पालघर** जिल्ह्याला उद्या रेड अलर्ट असल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातल्या सर्व शाळा आणि महाविद्यालयांना उद्या सुट्टी जाहीर केली आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात आजही पावसाचा जोर कायम आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी ३ ते ५ जुलै पर्यंत ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. समुद्र खवळलेला असून ताशी ४० ते ५० किलोमोटर वेगानं वारे वाहण्याची शक्यता आहे. त्यामुळे मच्छिमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना दिल्या आहेत.

<><><><><>

मुंबईला पाणी पुरवणाऱ्या तलावांच्या पाणलोट क्षेत्रातही पाऊस सुरू आहे. त्यामुळे शहराला पाणी पुरवणाऱ्या ७ तलावात सुमारे १ अब्ज लिटर इतका पाणी साठा वाढला आहे. या सर्व तलावात सुमारे ७० लाख लिटर इतकाच पाणीसाठा शिल्लक होता. यंदा पाऊस लांबल्यानं मुंबईकरांसाठी पाणी कपातीचं संकट निर्माण झालं होतं. मात्र या पावसामुळे हे संकट दूर होईल अशी अपेक्षा आहे.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ४४४ अकांची वाढ झाली आणि तो ७६ हजार ९२३ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १४० अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ६ अंकावर बंद झाला.

<><><><><>

ईशान किशन यानं ताज्या आयसीसी क्रिकेटपटू क्रमवारीत आपला सहकारी अभिषेक शर्माला मागे टाकत टी-२० आंतरराष्ट्रीय फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थान पटकावलं आहे. आज जाहीर करण्यात आलेल्या आयसीसीच्या ताज्या क्रमवारीनुसार, बेलफेस्ट इथं आयर्लंड विरुद्ध झालेल्या दोन सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत भारताचा ०-२ असा पराभव झाला असला, तरी ईशान किशननं आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम रेटिंग मिळवत अव्वल स्थान गाठले.

<><><><><>

अमेरिकेत सुरु असलेल्या फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेच्या राउंड ऑफ थर्टी टू सामन्यात आज रात्री अटलांटा इथे इंग्लंडचा मुकाबला कॉंगो प्रजासत्ताकाशी होणार आहे. सिऍटलमध्ये बेल्जीयमचा सामना सेनेगलशी तर कॅलिफोर्नियात सॅन्टा क्लारा इथे यजमान अमेरिकेची लढत बोस्निया बरोबर होणार आहे.

<><><><><>

गेल्या २४ तासात कोकणात बहुतांश ठिकाणी जोरदार पाऊस पडला, तर तुरळक ठिकाणी अतिवृष्टी झाली. विदर्भ आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी पाऊस पडला, तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकण, मराठवाडा आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**